MHKO120000742022

**नियमित दिवाणी दावा क्र.१८/२०२२**
(CNR No.MHKO120000742022)

## निशाणी क्र.५ व २७ खाली संयुक्त आदेश

वादी यांनी निशाणी क्र.५ वर प्रतिवादींच्या विरुध्द दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ तसेच कलम १५१ अन्वये तुर्तातुर्त मनाई हुकुम मिळणेकरीता दाखल केला आहे. याउलट प्रतिवादींनी निशाणी क्र.२५ वर प्रतिदावा दाखल करुन निशाणी क्र.२७ वर वादीचे विरुध्द तुर्तातुर्त मनाईचा अर्ज दाखल केलेला आहे.

**दावा मिळकतीचे वर्णन :-**

मौजे नाधवडे, ता. भुदरगड, जि. कोल्हापूर येथील गट क्र.१८७१ त्याचे क्षेत्र हे ०-२८.४० आर आकार रु. ३-३१ पैसे यासी चतुःसिमा -

पुर्वेस - संभाजी पांडुरंग पाटील यांची जमिन
पश्चिमेस - आनंदा तुकाराम ढेकळे यांची जमिन
दक्षिणेस - गट क्र.१८७० ची जमिन
उत्तरेस - दिनकर भाऊसो पाटील यांची जमिन

(येणेप्रमाणे वर्णनाच्या शेतजमिनीस यापुढे **'दावा मिळकत'** असे संबोधण्यात आले आहे.)

**वादीचे निशाणी क्र.५ चे अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे** -

०२. दावा मिळकत ही वादी व वादीचे भाऊ चंद्रकांत, जयसिंग, श्रीपती यांचे प्रत्यक्ष समाईक कब्जा, मालकी व वहिवाटीची मिळकत आहे. दावा मिळकतीमध्ये वादी हे सालोसाल कष्ट मशागत करुन ऊस व भाताचे पिक घेत आहेत. तसेच दावा मिळकतीमधील सहहिस्सेदार वादी यांची भावजय हौसाबाई रंगराव पाटील ह्या मयत आहेत. दावा मिळकतीबाबत प्रतिवादी

क्र.१ व २ यांनी वादी व वादीचे भाऊ चंद्रकांत व श्रीपती यांचेविरुध्द रे.क.क्र.१०३/२००८ चा कायम मनाईचा दावा दाखल केलेला दावा खर्चासह नामंजूर झाला आहे. सदर आदेशाविरुध्द प्रतिवादी क्र.१ व २ यांनी मा. जिल्हा न्यायालय येथे दाखल केलेले रेग्युलर दिवाणी अपिल क्र.३७२/२०११ देखील नामंजूर झाले आहे. सदर आदेशाविरुध्द प्रतिवादी यांनी मा. उच्च न्यायालय येथे सेकंड अपील क्र.७५५/२०१७ दाखल केले होते. सदर सेकंड अपील देखील नामंजुर करण्यात आले आहे. दि.३०/०१/२०२२ रोजी कोणतेही कारण नसताना प्रतिवादी यांनी दावा मिळकतीमधील वादीचे कब्जास हरकत अडथळा केला. त्यामुळे दावा जमिनीमधील वादीचे शांततामय कब्जास हरकत अथवा अडथळा होवु नये म्हणुन वादींनी तुर्तातुर्त मनाई अर्ज प्रतिवादींच्या विरुध्द दाखल केलेला आहे.

**<u>प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी निशाणी क्र.२५ वर कैफियत व प्रतिदावा दाखल केलेला आहे. थोडक्यात प्रतिवादींचे कथन पुढीलप्रमाणे आहे</u>**

०३. दावा मिळकत ही पुर्वी प्रतिवादींच्याकडे कुळ नात्याने व त्यानंतर मालकी हक्काने कब्जे वहिवाटीत आलेली आहे. प्रतिवादी हे दावा जमिनीमध्ये ऊस व भात ही पिके घेतात. दावा जमिनीचे ७/१२ पत्रकी प्रतिवादींची नांवे जमिन कसणार या नात्याने नोंद आहेत. वादी यांनी दावा जमिन ही प्रतिवादींना दि.०४/०६/२००१ रोजी दुय्यम निबंधक, राधानगरी यांच्यासमोर रक्कम रु.३५,५००/- घेवुन खरेदी दस्त क्र.१२८७ अन्वये खरेदी दिलेली आहे. खरेदी तारखेपासुन दावा जमिन मालकी हक्काने प्रतिवादी उपभोगत आहेत. वादीचा दावा जमिनीशी कोणताही संबंध नाही. प्रतिवादींनी दावा जमिनीतील ऊस हा अनेकदा श्री दुधगंगा वेदगंगा सहकारी साखर कारखान्यास पाठविला आहे. वादीने सन २००८ मध्ये दावा दाखल केला होता व सदर दावा तांत्रिक मुद्यावर खरेदीखत शाबित न झाल्यामुळे नामंजूर करण्यात आला आहे. आजपर्यंत दावा जमिनीमध्ये प्रतिवादींचा ताबा आहे. प्रतिवादींनी दैनिक लोकमत या वृत्तपत्रामध्ये जाहीर नोटीस प्रसिध्द करुन वादीबरोबर दावा मिळकतीबाबत इतर इसमांनी कोणताही व्यवहार करु नये असे जाहीर केले. दावा मिळकतीच्या ७/१२ पत्रकी वादीच्या नावाची पोकळ नोंद असुन त्याचा गैरफायदा घेवुन वादी हे दावा मिळकत हस्तांतर करण्याच्या प्रयत्नात आहेत. त्यामुळे प्रतिवादींनी प्रतिदाव्यासोबत निशाणी क्र.२७ वर मनाईचा अर्ज दाखल

केलेला आहे. (येथुन पुढे मुळ वादीला "वादी" व मुळ प्रतिवादी यांना "प्रतिवादी" असे संबोधण्यात येईल.)

०४. वादीतर्फे विधिज्ञ श्री .ए.के.पोर्लेकर व प्रतिवादी क्र.१ ते ५ तर्फे विधिज्ञ श्री.जी.टी.ठाकुर यांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखावरील परिस्थितीचे अवलोकन केले असता, खालील प्रश्नबिंदू माझ्या विचारार्थ निघतात. त्यावरील निष्कर्ष खालील प्रमाणे कारणमिमांसेसह नोंदवत आहे.

| अ.क्र. | प्रश्नबिंदू | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १. | प्रथमदर्शनी केस कोणाच्या बाजुने आहे ? | : | वादीच्या बाजुने आहे. |
| २. | सोईचा समतोल कोणाच्या बाजूने आहे ? | : | वादीच्या बाजुने आहे. |
| ३. | प्रस्तुत अर्ज नामंजूर केल्यास कोणाचे अतोनात नुकसान होणार आहे ? | : | वादीचे नुकसान होणार आहे. |
| ४. | काय आदेश ? | : | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

०५. वादी यांनी निशाणी क्र.०३ सोबत मौजे नाधवडे, ता. भुदरगड, जि. कोल्हापूर येथील गट क्र.१८७१ चा ७/१२ उतारा, खाते क्र.१८९ चा ८अ चा उतारा, रे.क.क्र.१०३/२००८ मधील न्यायनिर्णय व हुकुमनाम्याची खरी नक्कल, रे. अपिल क्र.३७२/२०११ मधील ठराव व हुकुमनाम्याची खरी नक्कल, सेकंड अपील क्र.७५५/२०१७ चे कामी झाले आदेशाची सत्य प्रत व दावा मिळकतीचे फोटो सादर केले आहेत. तसेच वादी यांनी निशाणी क्र.५१ सोबत श्री दुधगंगा वेदगंगा सह साखर कारखाना लि. बिद्री याचेकडे दिलेल्या ऊस क्षेत्र नोंदीच्या अर्जाची स्थळप्रत, भुदरगड पोलिस ठाणे येथे दाखल केलेल्या एन.सी.आर. ची प्रत दाखल केली आहे. तसेच वादी यांनी निशाणी क्र.६८ सोबत मौजे नाधवडे, ता. भुदरगड येथील डायरी क्र.३९२ चा उतारा दाखल केला आहे.

०६. प्रतिवादी यांनी निशाणी क्र.४६ सोबत दावा मिळकतीचे प्रतिवादीचे पुर्वहक्कदार यांचे हक्कात झाले खरेदीपत्राची छायांकित प्रत, तहसिलदार, भुदरगड यांनी पाठविलेल्या नोटीसची छायांकित प्रत, प्रतिवादी यांनी दैनिक लोकमत वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द केलेली जाहीर नोटीस इत्यादी कागदपत्रे सादर केली आहेत. तसेच प्रतिवादी यांनी निशाणी क्र.५३ सोबत श्री. शिवाजी सिताराम पाटील यांनी मॅनेजिंग डायरेक्टर, दुधगंगा सह साखर कारखाना यांना दिलेला अर्ज व त्यावरील खुलासा सादर केला आहे. तसेच प्रतिवादी यांनी निशाणी क्र.४७ वर साक्षीदार - पांडुरंग गंगाराम पाटील यांचे ॲफिडेव्हीट, निशाणी क्र.४८ वर साक्षीदार - ऋषीकेश सुरेश पाटील यांचे ॲफिडेव्हीट, निशाणी क्र.४९ वर साक्षीदार - बाळकृष्ण बापूसो पाटील यांचे ॲफिडेव्हीट दाखल केले आहे.

०७. **<u>उभय पक्षकारांना मान्य असलेल्या बाबी -</u>**

१. प्रतिवादी - दत्तात्रय पाटील व शिवाजी पाटील यांनी वादीच्या विरुध्द दिवाणी दावा क्र.१०३/२००८ हा कायम मनाईकरीता दाखल केला होता व तो नामंजूर करण्यात आलेला आहे.

२. दिवाणी दावा क्र.१०३/२००८ मधील हुकुमनाम्याविरुध्द प्रतिवादी क्र.१ व २ यांनी दाखल केलेले रेग्युलर दिवाणी अपिल क्र.३७२/२०११ देखील नामंजूर झाले आहे.

३. रेग्युलर दिवाणी अपिल क्र.३७२/२०११ मधील हुकुमनाम्याविरुध्द प्रतिवादी यांनी दाखल केलेले सेकंड अपील क्र.७५५/२०१७ देखील नामंजुर करण्यात आले आहे.

**<u>प्रश्नबिंदु क्रमांक १ करिता</u> - ( प्रथमदर्शनी केस )**

०८. प्रतिवादी तर्फे विधिज्ञ श्री.जी.टी.ठाकुर यांनी असा युक्तीवाद केला की, प्रतिवादी हे प्रथम कुळ म्हणुन दावा जमिनीत कब्जेदार व मालक होते, त्यानंतर खरेदीखताने प्रतिवादी हे दावा जमिनीचे मालक व कब्जेदार झालेले आहेत. वादीने दि.०४/०६/२००१ रोजीचे नोंदणीकृत खरेदीपत्र प्रतिवादी यांच्या हक्कात करुन दिलेले आहे. दावा जमिनीत प्रतिवादींचा कब्जा व मालकी आहे. तांत्रिक दृष्ट्या खरेदीपत्र शाबित न झालेमुळे प्रतिवादींनी जो दिवाणी

दावा दाखल केला होता तो रद्द झालेला आहे. सदर दावा रद्द झाला म्हणुन प्रतिवादींचा दावा जमिनीत कब्जा नव्हता व नाही, हे शाबित होत नाही. दावा जमिनीच्या ७/१२ पत्रकी जमिन कसणा-याचे नांव म्हणुन प्रतिवादींच्या नांवाची नोंद आहे. वादी याने प्रस्तुत दाव्यामध्ये त्याच्या भावांना पक्षकार केलेले नाही. दि.०४/०६/२००१ रोजीचे खरेदीखत कोणत्याही न्यायालयाने रद्द केलेले नाही.

०९. वादीतर्फे विधिज्ञ श्री.ए.के.पोर्लेकर यांनी असा युक्तीवाद केला की, प्रतिवादींनी नियमित दिवाणी दावा क्र.१०३/२००८ दाखल केला होता, तो गुणदोषावर नामंजूर झालेला आहे. तसेच मा. जिल्हा न्यायालय, कोल्हापूर व मा. उच्च न्यायालय यांचेकडे दाखल केलेली अपिल देखील नामंजूर करण्यात आली आहेत. वादी व वादीचे भाऊ दावा जमिनीचे सहहिस्सेदार आहेत. दावा जमिनीवर वादींचा वर्षानुवर्षे ताबा आहे.

१०. मान्य परिस्थितीनुसार, प्रतिवादी - दत्तात्रय पाटील व शिवाजी पाटील यांनी सन २००८ मध्ये दिवाणी दावा क्र.१०३/२००८ हा कायम मनाई हुकुमाकरीता दाखल केला होता. प्रस्तुत दावा हा न्यायालयाने नामंजूर केला होता. दिवाणी दावा क्र.१०३/२००८ मधील न्यायनिर्णयाचे अवलोकन केले असता, माझ्या पुर्व पिठासिन अधिकारी यांनी प्रस्तुत न्यायनिर्णयामध्ये प्रतिवादींचा दावा मिळकतीवर ताबा असल्याबाबत मुद्दा काढलेला होता. सदर मुद्दा गुणदोषावर निकाली होवुन प्रतिवादींचा दावा जमिनीत ताबा नसल्याचे निष्कर्षित केलेले आहे. सदर न्यायनिर्णयाचे अवलोकन केले असता, सदर दावा प्रतिवादींनी कुळ हक्क व खरेदीपत्र शाबित न केल्यामुळे नामंजूर करण्यात आलेला आहे. सदर दाव्यातील हुकुमनाम्याविरुध्द प्रतिवादींनी मा. जिल्हा न्यायालय व मा. उच्च न्यायालय येथे अपिल दाखल केले होते. सदर दोन्ही अपिले नामंजूर करण्यात आलेली आहेत. आजपर्यंत कोणत्याही न्यायालयाने दिवाणी दावा क्र.१०३/२००८ मधील हुकुमनामा रद्द केलेला नाही अथवा स्थगित केलेला नाही. त्यामुळे सद्य स्थितीत दावा जमिनीवर प्रतिवादींचा ताबा आहे हे प्रथमदर्शनी दिसुन येत नाही. तसेच सद्य स्थितीत दावा जमिनीमध्ये ताबा असल्याबाबत कोणताही सबळ पुरावा प्रतिवादी यांच्यातर्फे दाखल करण्यात आलेला नाही. परिणामतः खरेदीखत रद्द केले नाही हा युक्तीवाद ग्राह्य धरता येणार नाही. तसेच सदर खरेदीखत रद्द केले नाही याचा अर्थ दावा मिळकतीवर सद्या प्रतिवादींचा कब्जा आहे असा होत नाही.

११. वादीच्या दावा जमिनीवरील ताब्याबाबत कारणमिमांसा करताना दिवाणी दावा क्र.१०३/२००८ मधील न्यायनिर्णयाचे अवलोकन करणे गरजेचे आहे. प्रस्तुत न्यायनिर्णयाच्या परिच्छेद क्र.९ मध्ये वादी - दत्तात्रय धोंडीराम पाटील याने दिवाणी दावा क्र.१०३/२००८ मध्ये आपल्या उलटतपासात दावा जमिन ही वादींची वडिलोपार्जित जमिन असल्याचे मान्य केलेले आहे. तसेच दावा जमिनीच्या ७/१२ पत्रकी वादीचे नांव मालक सदरी असल्याचे देखील मान्य केलेले आहे. सदर उलटतपासातील दत्तात्रय पाटील यांनी दिलेल्या जबाबावरुन हे स्पष्ट होते की, दावा जमिन ही वादी यांची वडिलोपार्जित मिळकत असुन ती वादीच्या मालकीची आहे. निशाणी क्र.०३ खालील दावा जमिनीच्या सन २०१८-२०२१ च्या ७/१२ पत्रकाचे अवलोकन केले असता, दिलीप पाटील व त्यांचे भाऊ चंद्रकांत पाटील, जयसिंग पाटील, श्रीपती पाटील व भावजय हौसाबाई पाटील यांच्या नावाची भोगवटादार व जमिन कसणार म्हणुन नोंद आहे. त्यामुळे प्रथमदर्शनी वादीचा व वादीच्या इतर सहहिस्सेदारांचा दावा जमिनीत ताबा असल्याचे दिसुन येते. मान्य परिस्थितीनुसार, प्रतिवादींनी कैफियत व प्रतिदावा दाखल करुन वादीचा दावा जमिनीवरील ताबा नाकारला आहे, म्हणजेच प्रतिवादींनी अप्रत्यक्षरित्या वादीच्या दावा जमिनीवरील कब्जास अडथळा निर्माण केला आहे.

१२. वादी तर्फे विधिज्ञ यांनी आपली भिस्त खाली नमुद न्यायनिवाडयावर ठेवली.

Taracharan Rath Vs. Sashi Bhusan Tripathy

[2017 GoJuris (ORI) 489]

प्रस्तुत न्यायनिवाडयामध्ये मा. उच्च न्यायालय, ओरिसा यांनी असे निर्देशित केले आहे की, इतर सहहिस्सेदार (Co-Owners) यांच्या वतीने एखादा सहहिस्सेदार दावा दाखल करु शकतो. एखादा सहहिस्सेदार दुस-या किंवा इतर सहहिस्सेदारांच्या फायद्याकरीता दावा दाखल करु शकतो. प्रस्तुत प्रकरणात वादी व वादीचे इतर भाऊ हे दावा मिळकतीत सहहिस्सेदार आहेत. सबब वादी हा इतर सहहिस्सेदारांच्या फायद्याकरीता स्वतः दावा दाखल करु शकतो.

१३. प्रतिवादी तर्फे विधिज्ञ यांनी आपली भिस्त खाली नमुद न्यायनिवाडयांवर ठेवली.

1] VENKAT DHARMAJI GONTALWAR V. VISHWANATH AND ANOTHER [AIR 1983 BOMBAY 413]

2] Dr.N.Seetharam Shetty and another vs. Upendra Madhav Kini and another [2000(1) Civil LJ 827]

प्रस्तुत न्यायनिवाडयांमध्ये मा. उच्च न्यायालय, ओरिसा यांनी असे निर्देशित केले आहे की, जर एखादा व्यक्तीने एखादा व्यक्तीच्या हक्कात करारपत्र करुन दिले असेल तर ज्या व्यक्तीच्या हक्कात करारपत्र करुन दिले आहे तो इसम तुर्तातुर्त मनाईचा हक्कास पात्र असतो. तसेच खरेदीपत्र वादग्रस्त असेल तर वादीची प्रथमदर्शनी केस असते. मान्य परिस्थितीनुसार, दिवाणी दावा क्र.१०३/२००८ मधील हुकुमनामा कोणत्याही न्यायालयाने रद्द केलेला नाही अथवा स्थगित केलेला नाही. सदर दिवाणी दावा क्र.१०३/२००८ हा दि.०४/०६/२००८ रोजीचे खरेदीपत्र शाबित न झाल्यामुळे नामंजूर करण्यात आलेला आहे. तसेच सदरच्या न्यायनिर्णयामध्ये दावा मिळकतीवर प्रतिवादी - दत्तात्रय पाटील व शिवाजी पाटील यांचा ताबा नसलेबाबत निर्देशित केलेले आहे. त्यामुळे प्रतिवादी यांनी निशाणी क्र.४७, ४८ व ४९ वर दाखल केलेल्या साक्षीदारांचे ॲफिडेव्हीट सदर न्यायनिर्णयाच्या पुढे जावुन वाचणे योग्य होणार नाही. सबब उपरोक्त दोन्ही न्यायनिवाडे प्रतिवादींना सहाय्य करत नाहीत. वरील सर्व कारणमीमांसेवरुन प्रथमदर्शनी केस वादीच्या बाजुने आहे. सबब मी प्रश्नबिंदु क्र.१ ला वादीच्या बाजुने होकारार्थी निष्कर्ष नोंदवतो.

**प्रश्नबिंदु क्रमांक २ करिता - ( सोईचा समतोल )**

१४. मान्य परिस्थितीनुसार वादी हा शेतकरी आहे. वादी व त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह शेतीवर अवलंबुन आहे. प्रतिवादींनी कैफियत व प्रतिदावा दाखल करुन वादीचा दावा जमिनीवरील ताबा नाकारला आहे, म्हणजेच प्रतिवादींनी अप्रत्यक्षरित्या वादीच्या दावा जमिनीवरील कब्जास अडथळा निर्माण केला आहे. त्यामुळे प्रतिवादींच्या सदर वर्तणुकीमुळे वादीचा दावा जमिनीवरील कब्जा प्रतिवादींकडुन काढुन घेण्याची शक्यता नाकारता येत नाही. परिणामतः सोईचा समतोल सद्य परिस्थितीत वादीच्या बाजुने आहे. परिणामतः मी प्रश्नबिंदु क्र.२ ला वादीच्या बाजुने होकारार्थी निष्कर्ष नोंदवतो.

**प्रश्नबिंदु क्रमांक ३ व ४ करिता - ( अपरिमित नुकसान व आदेश )**

१५. प्रश्नबिंदु क्र.१ व २ चे निष्कर्षावरुन प्रथमदर्शनी केस व सोईचा समतोल वादीच्या बाजुने आहे. भारतीय संविधानाचे कलम ३००-अ नुसार, मालमत्तेचा हक्क सांगतो की, शासनाशिवाय एखाद्या व्यक्तिला त्याच्या स्थावर मालमत्तेपासुन वंचित ठेवण्याचा अधिकार कोणालाही नाही. मान्य परिस्थितीनुसार, जर दावा जमिनीतुन वादीचा कब्जा गेल्यास वादीच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण होईल. तसेच वादीला त्याच्या मिळकतीच्या उपभोगापासुन वंचित रहावे लागेल व तसे झाल्यास वादीचे अपरिमित नुकसान होणार आहे. परिणामतः मी प्रश्नबिंदु क्र.३ ला वादीच्या बाजुने होकारार्थी निष्कर्ष नोंदवतो व न्यायाचे उद्दिष्ट साधण्याकरिता पुढील आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. वादीचा निशाणी क्र.५ वरील अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी किंवा त्यांच्या तर्फे कोणत्याही इसमाने दावा मिळकतीमधील वादीचे कब्जा वहिवाटीस कोणत्याही प्रकारे हरकत व अडथळा करु नये, असा प्रतिवादी क्र.१ ते ५ विरुध्द प्रस्तुत दाव्याचे अंतिम निकालापावेतो तुर्तातुर्त मनाईचा हुकुम देणेत येत आहे.

३. प्रतिवादींचा निशाणी क्र.२७ वरील अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

४. खर्चाचा आदेश मूळ दाव्यात समाविष्ट करण्यात येत आहे.

सही/-
**( व्ही. बी. मुल्ला )**
दिवाणी न्यायाधीश क. स्तर, गारगोटी

स्थळ : गारगोटी.
दिनांक : २५/०१/२०२४.